सत्यमेव जयते

महाराष्ट्र शासन
उच्च व तंत्रशिक्षण विभाग

## कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य

# महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

# राज्यस्तरीय बालचित्रकला स्पर्धा

२०२६

## - स्पर्धा व्यवस्थापन परिपूर्ण मार्गदर्शक सूचना -



# राज्यस्तरीय बाल चित्रकला स्पर्धा २०२६

## शुभेच्छा संदेश

कला संचालनालय महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या नियंत्रणाखालील महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ आयोजित 'राज्यस्तरीय बाल चित्रकला स्पर्धा २०२६' निमित्त राज्यातील सर्व सन्माननीय मुख्याध्यापक, शिक्षकवृंद आणि माझ्या बालकलाकार मित्रांना मनःपूर्वक शुभेच्छा!

ही स्पर्धा विद्यार्थ्यांच्या सुप्त कलागुणांना वाव देऊन त्यांची कल्पकता आणि सृजनशीलता फुलवण्यासाठी एक उत्तम व्यासपीठ आहे. सर्व शाळा व कलाशिक्षकांनी जास्तीत जास्त विद्यार्थ्यांना सहभागी होण्यासाठी प्रोत्साहित करावे, जेणेकरून बालकलाकारांनी कोणत्याही भीतीशिवाय आपल्या मनातील सुंदर विचार व रंग कागदावर मोकळेपणाने उधळावेत.

स्पर्धेत सहभागी होणाऱ्या सर्व बालचित्रकारांना उज्वल भविष्यासाठी हार्दिक शुभेच्छा!

**डॉ किशोर इंगळे**
**संचालक,**
**कला संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई**

**श्री विनोद दांडगे**
**संचालक,**
**महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई**




# टप्पा १: स्पर्धापूर्व तयारी व विषय प्रसिद्धी

**पोर्टल लॉगिन:** दिनांक **०७ ऑगस्ट २०२६** रोजी **सकाळी ११:०० वाजता** शाळेच्या अधिकृत लॉगिनवरून बालचित्रकला स्पर्धा पोर्टलवर प्रवेश करून गटनिहाय विषय डाऊनलोड करावेत.

## विषय प्रसिद्धी व गोपनीयता

प्राप्त झालेले *विषयाची गोपनीयता स्पर्धा सुरू होईपर्यंत राखणे बंधनकारक आहे.* विषय स्पर्धेच्या दिवशी व ठिकाणी **ब्लॅकबोर्डवर स्पष्ट व ठळक अक्षरात** लिहावेत.

## स्पर्धेचा दिवस

बाल चित्रकला स्पर्धा दिनांक **८ ऑगस्ट २०२६** रोजी शाळेच्या नियोजित वेळेतील कोणत्याही दोन तासांमध्ये घेण्यात यावी.

## विद्यार्थ्यांना सूचना

सर्व विद्यार्थ्यांना त्यांच्या गटनिहाय विषयांची ओळख करून द्यावी आणि स्पर्धेचे नियम व वेळेची स्पष्ट कल्पना द्यावी.




# टप्पा २: चित्रकला ड्रॉईंग पेपर


**अधिकृत शिक्का:** विद्यार्थ्यांना पेपर देण्यापूर्वी, चित्राच्या **पाठीमागील बाजूस उजव्या हाताच्या वरच्या कोपऱ्यात** कला शिक्षण मंडळाने दिलेल्या नमुन्याप्रमाणे शिक्का व शाळेचा अधिकृत शिक्का मारावा.

## विद्यार्थ्यांचा तपशील

विद्यार्थ्यांनी शिक्क्यामधील सर्व आवश्यक माहिती (नाव, गट, बैठक क्रमांक, शाळेचे नाव इ.) अचूक भरल्याची खात्री करावी.

## पर्यवेक्षक स्वाक्षरी

भरलेली माहिती तपासून **पर्यवेक्षकाने स्वतःची स्वाक्षरी व दिनांक** नोंदवणे बंधनकारक आहे. *(टीप: स्वाक्षरी व शिक्का नसलेले पेपर मूल्यांकनासाठी ग्राह्य धरले जाणार नाहीत.)*




स्पर्धा स्टॅम्प वरील मजकूर

| महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई<br>**बालचित्रकला स्पर्धा** | |
|---|---|
| **शाळेचे नाव** | |
| **विद्यार्थ्याचे नाव** | |
| **इयत्ता** | |
| **गट** | |
| **दिनांक** | |
| **पर्यवेक्षकाची स्वाक्षरी** | |

स्टॅम्पचा आकार: 6 cm X 10 cm



# टप्पा ३: वेळ व घंटा संकेत

स्पर्धेचा एकूण कालावधी **२ तास** असेल. वेळेचे नियोजन खालीलप्रमाणे ठेवावे:

1. **पहिली घंटा (सुरुवात )**

   कागद वाटप व मार्गदर्शन पूर्ण झाल्यावर स्पर्धा सुरू झाल्याची घंटा द्यावी.

2. **दुसरी घंटा (१ तास पूर्ण)**

   १ तासाचा अवधी संपल्यावर विद्यार्थ्यांना उर्वरित वेळेची जाणीव करून देण्यासाठी इशारा घंटा द्यावी.

3. **तिसरी घंटा (अंतिम - समाप्ती)**

   २ तास पूर्ण होताच अंतिम घंटा देऊन चित्रकाम पूर्णपणे थांबवावे.

- स्पर्धेमध्ये जे विद्यार्थी अनुपस्थित असतील त्यांची अनुपस्थिती लॉगिन पोर्टल वरती नोंदविणे बंधनकारक राहील.
- स्पर्धा सुरू असताना केंद्राचे नाव केंद्र क्रमांक व विद्यार्थी सहभाग असे छायाचित्र घेऊन ठेवावे.




# टप्पा ४: जमा करणे, पॅकिंग व हस्तांतरण

## रंग सुकवणे

जलरंग/पोस्टर कलर वापरलेल्या चित्रांचे रंग व्यवस्थित सुकले आहेत याची खात्री करूनच चित्रे जमा करावीत.

## ब्राऊन पेपर पॅकिंग

सर्व जमा केलेल्या कलाकृती गटनिहाय वेगळ्या करून सुरक्षितपणे **ब्राऊन पेपर (Brown Paper)** मध्ये बांधून सीलबंद (Seal) कराव्यात.

## पॅकेटवरील लेबल

सीलबंद पॅकेटवर **शाळेचे नाव, पत्ता, स्पर्धेचा गट, एकूण जमा चित्रसंख्या आणि मुख्याध्यापक/पर्यवेक्षकांची स्वाक्षरी** असलेले लेबल लावावे.

## सीलबंद जमा करणे

जिल्हा/तालुका समन्वयकांशी संपर्क साधून हे गटनिहाय सीलबंद पॅकेट गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती व महानगरपालिका कार्यक्षेत्रातील शाळांनी संबंधित महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकारी / प्रशासनाधिकारी यांच्याकडे सुरक्षितपणे हस्तांतरित करून पोच पावती घ्यावी. **बृहन्मुंबई क्षेत्रातील शाळांनी शिक्षण निरीक्षक, मुंबई (उत्तर /दक्षिण /पश्चिम )** हस्तांतरित करून पोच पावती घ्यावी.

# टप्पा ५: प्रशासकीय शिस्त व तांत्रिक मदत

## मुख्याध्यापक व शिक्षकांची जबाबदारी

स्पर्धेत कोणताही गैरप्रकार घडणार नाही याची पूर्ण जबाबदारी संबंधित **मुख्याध्यापक, कलाशिक्षक व वर्ग पर्यवेक्षक** यांची राहील.

## हेल्पलाइन संपर्क

स्पर्धेदरम्यान काही तांत्रिक (उदा. लॉगिन समस्या) किंवा प्रशासकीय अडचण उद्भवल्यास तात्काळ मंडळाने उपलब्ध करून दिलेल्या अधिकृत हेल्पलाइन क्रमांकावर संपर्क साधावा.

- **स्पर्धा पोर्टल:** balchitrakala2026.msbae.in
- **तांत्रिक सहाय्य** - **8355870544, 7972341657, 9209403938**



## जिल्हा निहाय संपर्क अधिकारी आणि त्यांची माहिती खालीलप्रमाणे आहे.
## कोणत्याही तांत्रिक किंवा प्रशासकीय मदतीसाठी संबंधित अधिकाऱ्यांशी संपर्क साधावा.

| मंडळाच्या अधिकारी / कर्मचारी | भ्रमनध्वनी क्र. | विभाग | जिल्हा |
|---|---|---|---|
| श्री. विजय राणे<br>कु. श्रद्धा विधाते | 7045405540<br>9619815505 | कोकण | मुंबई शहर, मुंबई उपनगर, ठाणे, रत्नागिरी,<br>सिंधुदुर्ग, रायगड, पालघर |
| श्री. मंगेश कदम<br>कु. पूजा देवरे | 9969502288<br>9766417308 | पुणे | पुणे, कोल्हापूर, सोलापूर, सांगली, सातारा |
| श्री. दत्तात्रय कनप<br>कु. शेफाली वारंग | 9594344659<br>9324271397 | नाशिक | नाशिक, नंदुरबार, अहिल्यानगर, जळगाव, धुळे |
| श्रीम. शारदा विरकर<br>कु. समिक्षा सलपे | 9867070875<br>8600574877 | छत्रपती संभाजीनगर | जालना, लातूर, धाराशिव, बीड, परभणी<br>छत्रपती संभाजीनगर, हिंगोली, नांदेड |

| मंडळाच्या अधिकारी / कर्मचारी | भ्रमनध्वनी क्र. | विभाग | जिल्हा |
|---|---|---|---|
| श्रीम. कांचन पाटील<br>श्रीम. वैदेही रुके | 9619835001<br>9867212698 | अमरावती | अकोला, अमरावती, वाशीम, यवतमाळ, बुलढाणा |
| श्री. सुरेश पवार<br>कु. सुबोध कदम | 9833858036<br>9920928408 | नागपूर | नागपूर, नागपूर, वर्धा, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली |

# महत्त्वाच्या संपर्क व्यक्ती:

### श्रीम. स्मिता किंकळे

सचिव, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ, मुंबई

**84258 57357**

### श्री. विजय बोंदर

मुख्य समन्वयक, बालचित्रकला स्पर्धा

**98677 98207**

### श्री. नागेश वाघमोडे

परीक्षा नियंत्रक, महाराष्ट्र राज्य कला शिक्षण मंडळ

**98670 82560**





# स्पर्धेसाठी सर्व विद्यार्थ्यांना शुभेच्छा ! व धन्यवाद